**घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१६/प्र.क्र.२०४/नवि-३४**
शहीद राजगुरू चौक, मदाम कामा मार्ग.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २१ सप्टेंबर, २०१७.

**वाचा-**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरण वदल मंत्रालयाची अधिसूचना दि ८/४/२०१६

**प्रस्तावना-**

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छतेविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रित करून सर्व नागरिकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे याकरीता केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालयाने यापूर्वी अस्तित्वात असलेले नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० अधिक्रमित करून एप्रिल २०१६ मध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अधिसूचित केले आहेत.

२. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील नियम क्र. ११, १२ व १५ मध्ये अनुक्रमे राज्यांच्या नगर विकास विभागाच्या सचिवांच्या, जिल्हाधिकाऱ्यांच्या व शहरांच्या घनकचरा व्यवस्थापन संदर्भातील कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच, नियम क्र. २३ मध्ये प्रत्येक राज्याने घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात राज्यस्तरावर राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील नियम क्र. २३ नुसार राज्यातील घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी पुढीलप्रमाणे “राज्यस्तरीय सल्लागार समिती” गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.-

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रधान सचिव, नवि-२ नगर विकास विभाग | पदसिध्द अध्यक्ष |
| (२) | सह सचिव ग्राम विकास विभाग किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचे अधिकारी (ग्राम विकास विभागाचा प्रतिनिधी) | पदसिध्द सदस्य |
| (३) | महसुल व वन विभागाचा प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (४) | केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालयाचा प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (५) | केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाचा प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (६) | केंद्र शासनाच्या ग्राम विकास मंत्रालयाचा प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (७) | केंद्र शासनाच्या प्रदूषण नियंत्रण बोर्डचा प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (८) | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | पदसिध्द सदस्य |
| (९) | भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT)/राष्ट्रीय तंत्रज्ञान (NIT) संस्थेचा एक प्रतिनिधी | पदसिध्द सदस्य |
| (१०) | संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | सदस्य सचिव |

२. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील नियम क्र. २३ नुसार उपरोक्त पदसिध्द अध्यक्ष व सदस्य यांच्या व्यतिरिक्त राज्यस्तरीय सल्लागार समितीवर उर्वरित सदस्यांचे नामनिर्देशन यथावकाश करून त्यांचा या समितीमध्ये समावेश करण्यात येईल.

३. उपरोक्त राज्यस्तरीय सल्लागार समितीच्या वर्षातून किमान २ बैठका घेण्यात याव्यात. सदर बैठकांमध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, राज्याचे घनकचरा व्यवस्थापन विषयक धोरण व कार्यप्रणाली यावर चर्चा करून, त्या अनुषंगाने सदर समिती राज्य शासनास शिफारसी करील. सदर समिती राज्यात घनकचरा व्यवस्थापन नियमांची योग्य व तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी पार पाडेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२११६५७५३८२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Sudhakar
Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.09.21 16:49:01 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सह सचिव, पर्यावरण वन व वातावरण बदल मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली.
८. सह सचिव, नगर विकास मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली.
९. सह सचिव, ग्राम विकास मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली
१०. अध्यक्ष, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली
११. अध्यक्ष, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) दिल्ली
१२. अध्यक्ष, राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (NIT) दिल्ली
१३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१४. विभागीय आयुक्त (सर्व)
१५. जिल्हाधिकारी (सर्व)
१६. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१७. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती (सर्व)
१८. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१९. निवडनस्ती, नवि-३४.